प्रेसनोट

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती

जा.क्र. १९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०४/२०१८

भंडारा:— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. १४/०४/२०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधिक्षक (गृह) कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

भारतत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एफ्रील १८९१ रोजी झाला. बडोदयाचे महाराज सयाजी राव गायकवाड व कोल्हापुरचे शाहु महाराज यांच्या आर्थीक सहाय्यावर ते बि. ए. झाले, परदेशात जावुन त्यांनी अर्थशास्त्र या विषयात एम. ए. पी. एच. डी. या पदव्या मिळविल्या. तेथे बरिस्टर झाले. सिडनहॅम महाविदयालयात काही काळ ते प्राथ्यापक, प्राचार्य पद सांबाळले. भिमरावांनी आपल्या समाजासाठी वकिली करण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्यांनी २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकरणी' सभा स्थापन केली. शिकवा चेतवा व संघटित कराहे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते व मुक समाजाचे नायक झाले.

दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी १९२७ मध्ये डॉ. आंबेडकरांनी महाडला 'चवदार तळे' येथे अहिसंक सत्याग्रह केला मंदीरात प्रवेश मिळविण्यासाठी सत्याग्रह केले. डॉ. आंबेडकरांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळावर काम केले. १९४२ साली ते केंद्र सरकारात मजुरीमंत्री होते. स्वातंत्र्योत्तर काळात ते स्वतंत्र भारताच्या घटनेचे शिल्पकार झाले. बाबासाहेबांनी १४ आक्टोबर १९५६ रोजी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्म स्विकारला.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. तेलुरे जिवीशा भंडारा, पोनी. गाडे वानीशा भंडारा, पोनी. कदम वाचक भंडारा, सपोनी. काळे, सपोनी. खंडाते, सपोनी. हत्तीमारे जिवीशा भंडारा, मपोउपनि. लांजेवार, मपोउपनी. चाटसे, पोउपनि. पंधरे श्वान पथक भंडारा, पोउपनी. आडोळे दोषसिध्दी भंडारा, पोउपनी. देशमुख बिडीडीएस भंडारा पोलीस मुख्यालय, पोलीस उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

14.4.2018

(सपोनी. जी.एम. काळे )
स्थागुशा भंडारा
दुरध्वनी.क्र. ९०२१२८२०३५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.